मराठी साहित्य परिषद
तेलंगण राज्य, हैदराबाद

# पंचधारा

वर्ष ६५ वे, अंक दुसरा
जुलै २०२३ ते सप्टेंबर २०२३
अधिक श्रावण ते भाद्रपद १९४४




## माध्यमांतर आणि प्रकारांतर विशेषांक

मराठी साहित्य परिषद, तेलंगण राज्य, हैदराबाद

RNI Reg. No. 32307/79

मूल्य : रु. २००/-

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ पुरस्कृत
मराठी साहित्य परिषद, (तेलंगण राज्य) या संस्थेचे त्रैमासिक मुखपत्र

# पंचधारा

## माध्यमांतर आणि प्रकारांतर विशेषांक


वर्ष ६६ वे, अंक दुसरा
जुलै २०२३ ते सप्टेंबर २०२३
आषाढ ते भाद्रपद १९४५



**संपादक मंडळ**

डॉ. विद्या देवधर (प्रमुख संपादक)
माधव रामराजे चौसाळकर
डॉ. शैलजा जोशी
मीना जहागिरदार
व्यंकटेश कुलकर्णी
डॉ. गायत्री शिरोळे
या अंकासाठी संपादन सहाय्य : प्रा. चिन्मय मधू घैसास



**मराठी साहित्य परिषद, तेलंगण राज्य**
इसामिया बाजार, हैदराबाद – ५०० ०२७
RNI Reg. No. : 32307/79

**कार्यवाह**
म. सा. प. तेलंगण राज्य
४-६-४५८, इसामिया बाजार, हैदराबाद – ५०० ०२७.
**भ्रमणध्वनी :** ७८४२८५३९८४
(संपर्क : सायंकाळी ५ ते ८) अन्यवेळी लिखित संदेश पाठवावे.

**प्रकाशक**
डॉ. विद्या देवधर

**सर्व हक्क :** म. सा. प. तेलंगण राज्य

या अंकात प्रकट झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.
फक्त एक व तीन वर्षांची वर्गणी स्वीकारली जाईल.
पंचधारेच्या आर्थिक व्यवहाराचे वर्ष एप्रिल ते मार्च असे आहे.
सर्व सभासदांनी आपले E-mail ID फोन नंबर
पुढील क्रमांकावर पाठवावेत. ७८४२८५३९८४
संपर्कासाठी : MAIL ID : mspaphydgmail.com

पंचधारा वर्गणी Marathi Sahity Parishad
IDBI Bank, Kachiguda Branch
A/C. No. 59410010000125 किंवा Panchdhara
A/C. No. 59410010001359, IFSC Code – IBKL0000594
(For both accounts) या खात्यावर जमा करावी. मनीऑर्डर पाठवू नये.

वार्षिक वर्गणी रु. ४००/-
तीन वर्षाची वर्गणी रु. १०००/-
आजीव सदस्य वर्गणी रु. ४०००/-
(वर्गणी शक्यतो डी. डी. ने पाठवावी)
बाहेरगावचा चेक असल्यास वटणावळीचे रु. ३५/- अधिक पाठवावेत, ही विनंती
या अंकाचे मूल्य : रु. २००/-
टपाल खर्च : रु. ३५/-

अक्षरजुळणी व मुखपृष्ठ : अमोघ आर्ट्स, पुणे ३०.

मुद्रक : श्रीगणेश मुद्रणालय, ३५७, शनिवार पेठ, पुणे ३०.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या अंकात प्रकट झालेल्या मतांशी आणि निष्कर्षांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

# अनुक्रमणिका


संपादकीय ........................................................................ ५

**भावपूर्ण श्रद्धांजली :**
मला भावलेल्या मालिनीताई राजूरकर ................ भारत देगलूरकर ................ ९

माध्यमांतराच्या अध्यापन-संशोधनातील अडचणी... प्रा. चिन्मय मधू घैसास
डॉ. योगेश शेळके ............. १४

रंग किरमिजी :
काव्य ते गीत : सर्जनाचा चिद्विलास .................. प्रवीण दवणे .................. १९

मराठी कादंबरीचे चित्रपट माध्यमांतर ................ डॉ. राजेंद्र थोरात ............... २३

पेशवाईवर आधारित ऐतिहासिक
कादंबऱ्यांचे प्रकारांतर आणि माध्यमांतर ............. डॉ. विनय मडगांवकर .......... ३३

ग्रामीण कादंबऱ्यांचे माध्यमांतर :
(निवडक कादंबऱ्यांच्या संदर्भात) .................... प्रा. विनायक ल. बापट ........ ४७

लोककला आणि लोकसमजुतींवर आधारित
कादंबऱ्यांचे माध्यमांतर : (चंद्रमुखी आणि जोगवा
चित्रपट यांच्या विशेष संदर्भात) ....................... प्रा. जयेश गावकर ............. ५७

'महानंदा' कादंबरीचे माध्यमांतर :
नाटक : गुंतता हृदय हे .............................. हेमंत बाळकृष्ण अय्या ......... ६९

माध्यमांतरातील आधुनिक आयाम :
कादंबरी ते वेबसेरिज ................................. तन्वी चाफाडकर ............... ७८

चरित्र-आत्मचरित्रात्मक साहित्यकृतींचे माध्यमांतर .. प्रा. चिन्मय मधू घैसास ........ ८६

चरित्र ग्रंथावरून चित्रपटनिर्मिती :
एक आनंददायी अनुभव ............................. डॉ. विद्या देवधर .............. ९६

# पेशवाईवर आधारित ऐतिहासिक कादंबऱ्यांचे प्रकारांतर आणि माध्यमांतर



डॉ. विनय मडगांवकर

## प्रास्ताविक

छत्रपती शिवाजी महाराजांच्या मराठा साम्राज्याचे पेशवे हे पंतप्रधान होते. छत्रपती शाहू महाराजांच्या काळात पेशवे बाळाजी विश्वनाथ यांच्या कार्यकर्तृत्वामुळे 'पेशवाई' नावारूपाला आली. त्या काळातील ऐतिहासिक घटनाप्रसंगांच्या आधारे मराठी साहित्यिकांनी एकाहून एक सरस, दर्जेदार साहित्यकृती निर्माण केल्या. पेशवाईवर आधारित ऐतिहासिक कादंबऱ्या आजही लोकप्रिय ठरत असल्याने या साहित्यकृतींचे मूल्यवर्धन झाल्याचे दिसून येते. त्याचाच परिणाम म्हणजे पेशवा बाजीरावांच्या भावविश्वावर आधारित ना. सं. इनामदार लिखित 'राऊ' या कादंबरीचे 'बाजीराव-मस्तानी' या हिंदी चित्रपटात माध्यमांतर झाले. पानिपत येथे झालेल्या रणसंग्रामावर आधारित विश्वास पाटील यांच्या 'पानिपत' या कादंबरीचे स्वतः लेखकानेच 'रणांगण' नाटकात प्रकारांतर केले. माधवराव पेशवे यांच्या जीवनावर आधारित रणजीत देसाई यांच्या 'स्वामी' या कादंबरीवर आधारित 'स्वामी' या मालिकेचे दूरदर्शनवर प्रसारण झाले. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये याच ऐतिहासिक कादंबऱ्यांचे झालेले प्रकारांतर आणि माध्यमांतर यांचा परामर्श घेतला आहे.

## पेशवा : स्वराज्याच्या अष्टप्रधान मंडळातील महत्त्वाचे पद

हिंदवी स्वराज्याची स्थापना करणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांचा इ.स. १६७४ मध्ये राज्याभिषेक झाला. या गौरवशाली इतिहासाचे इ.स. २०२३-२४ हे ३५० वे वर्ष आहे. राज्याभिषेकावेळी महाराजांनी स्वराज्य प्रशासनासाठी अष्टप्रधान मंडळाची स्थापना केली. या प्रधानमंडळातील प्रथम स्थान असलेल्या 'पंतप्रधान' तथा 'पेशवा' या पदावर मोरोपंत त्र्यंबक पिंगळे यांची नियुक्ती केली होती.[१] 'पेशवा' या फारसी शब्दाचा अर्थ 'अग्रणी' असा होतो. महाराजांच्या अष्टप्रधान सल्लागार मंडळातील हे महत्त्वपूर्ण पद होय. मराठा साम्राज्याच्या

उत्तरार्धात पुण्यातील पेशव्यांचा शनिवारवाडा प्रशासकीय संरचनेच्या केंद्रस्थानी होता. इतिहासात बाजीराव पेशवा (१७२०-१७४०), नानासाहेब पेशवा (१७४०-१७६१), माधवराव पेशवा (१७६१-१७७२) या तिन्ही पेशव्यांची कारकीर्द भिन्नभिन्न कारणांमुळे संस्मरणीय ठरली. त्या इतिहासाचा काही भाग मराठी साहित्यिकांनी आपआपल्या साहित्यकृतीमधून मांडण्याचा यथोचित प्रयत्न केला आहे.

## इतिहास आणि ऐतिहासिक कादंबरी

इतिहास म्हणजे घडून गेलेल्या घटना-प्रसंगांचे कालानुक्रमे वस्तुस्थितीदर्शक सुसंगत आणि पद्धतशीरपणे सप्रमाण केलेले विवेचन होय. इतिहासकारांनी मांडलेल्या या निदानांच्या, अनुमानांच्या आणि निष्कर्षांच्या संरचनेवर आधारित ऐतिहासिक साहित्यकृतींचा निर्माता स्वतःच्या प्रज्ञा आणि प्रतिभेच्या बळावर आपली साहित्यनिर्मिती करतो. यामधून इतिहासातील व्यक्तींचे, तसेच तत्कालीन समाजमनाच्या भावभावनांचे प्रस्तुतीकरण होत असते. त्यामुळे ऐतिहासिक साहित्यकार हा प्रतिभावंत असावाच, तसाच तो सत्यअसत्याचा शोध घेणारा तथ्यशोधक प्रज्ञावंतही असावा लागतो. विभा शहा यांच्या मतानुसार ऐतिहासिक कादंबरी ही कलाकृती असल्यामुळे तिचे स्वरूप इतिहासासारखे ज्ञानबोधात्मक नसून कलात्मक असते. ऐतिहासिक कादंबरीकार भूतकालीन घटना व व्यक्ती यांचे पुनरुज्जीवन करीत असतो. त्यामुळेच स्थूल ऐतिहासिक सत्यापासून काहीसा दूर राहू शकतो; परंतु ऐतिहासिक वास्तवापासून मात्र त्यास दूर राहता येत नाही. कादंबरी वाचत असताना क्षणभर वाचकाला भूतकाळात जाऊन आल्याचे जे समाधान मिळते, ते त्यातील ऐतिहासिक वास्तवाच्या जिवंत आणि उत्कट चित्रणामुळेच![२] ऐतिहासिक घटना आणि त्याला समर्पक कल्पना यांचा यथायोग्य सुमेळ ऐतिहासिक कलाकृतींमध्ये अनुस्यूत असतो. या निकषावर 'राऊ', 'पानिपत' आणि 'स्वामी' या कादंबऱ्या अभ्यासनीय आहेत. आजतागायत या कादंबऱ्यांच्या कित्येक नवीन आवृत्या पुनर्मुद्रित झाल्या आहेत. मराठी बरोबर अन्य भारतीय भाषांमध्येही अशा कादंबऱ्या प्रकाशित होऊन लोकप्रिय ठरल्या आहेत. विद्यमान युगातील पुढचे पाऊल म्हणजे त्यांचे प्रकारांतर आणि माध्यमांतर होय.

## साहित्यकृतीचे प्रकारांतर - माध्यमांतर

इतिहास तथा ऐतिहासिक साहित्यकृतीतील विषय वाचून समजून घेण्यापेक्षा,

रंजनात्मक पद्धतीने सादर केल्यास अधिक उत्तमरित्या समजतो. या मानवसुलभ स्वभावामुळे वाचकप्रियतेचा उच्चांक गाठलेल्या प्रतिथयश प्राप्त झालेल्या ऐतिहासिक साहित्यकृतींचे प्रकारांतर-माध्यमांतर करून त्यांचे मनोरंजनात्मक प्रस्तुतीकरण सुरू झाले. साहित्यकृतीतील मूळ आशयबीजाचे स्वरूप अबाधित राखून साहित्य-संहितेचे अन्य साहित्य प्रकारानुरूप केले जाणारे परिवर्तन म्हणजे प्रकारांतर.[३] विद्यमान युगात तंत्रज्ञानामुळे मुद्रित माध्यमांबरोबर, मालिका, चित्रपट, वेबसिरीज तथा अन्य इलेक्ट्रोनिक श्राव्य माध्यमांची निर्मिती झाली. कालानुक्रमे ती लोकप्रिय झाली.

मनोरंजनाची विविध यांत्रिक साधने उपलब्ध झाल्याने प्रेक्षकांची अभिरुची बदलली. त्यामुळे या माध्यमातूनही ऐतिहासिक विषय सादर होऊ लागले. 'साहित्यकृतीतील मूळ गाभा सुरक्षित ठेवून कथाशयाचे मध्यमानुसार यंत्राधिष्ठित प्रक्रियेने होणारे नवसर्जन म्हणजे माध्यमांतर.[४] इतिहास तथा ऐतिहासिक कादंबरीतील कथाशय नाटक तसेच चित्रपट, दूरदर्शन मालिका, वेबसिरीज यासारख्या माध्यमातून प्रस्तुत केल्याने अधिकांश प्रेक्षकांपर्यंत पोहोचणे सुलभ झाले. याला काही मर्यादा असल्या तरी 'बाजीराव-मस्तानी' या हिंदी चित्रपटामुळे 'राऊ' या कादंबरीने चरित्रनायक, 'अपराजित योद्धा' हा बाजीराव पेशव्यांचा पराक्रम असंख्य प्रेक्षकांपर्यंत पोहोचला. 'रणांगण' नाटकामुळे 'पानिपत' कादंबरीचा आशय आणि धारातीर्थी पडलेल्या पुरुषाची गौरवगाथा भारतीय जनतेला समजली. दूरदर्शनवरील 'स्वामी' या मालिकेमुळे रमा आणि माधवराव पेशवे यांचा इतिहास 'स्वामी' कादंबरी न वाचलेल्या प्रेक्षकांनाही ज्ञात झाला.

## 'राऊ' मराठी कादंबरीचे 'बाजीराव-मस्तानी' हिंदी चित्रपटात माध्यमांतर

### १. पराक्रमी योद्धा बाजीराव पेशवा

श्रीमंत बाजीराव पेशव्यांनी अवघ्या ४० वर्षांच्या आयुष्यात देदिप्यमान आणि गौरवशाली इतिहास घडवला. छत्रपती शाहू महाराजांनी बाळाजी विश्वनाथांच्या निधनानंतर बाजीरावांस 'पेशवे' पदाची वस्त्रे दिली. शाहू महाराजांचा विश्वास सार्थ ठरवत बाजीरावांनी आपल्या डावपेचांनी मुघल, निजाम, सिद्दी अशा पिढीजात शत्रूंना नामोहरम केले. शिवछत्रपतींच्या हिंदवी स्वराज्याच्या सीमा सर्वार्थाने सुरक्षित राहाव्यात त्यासाठी महाराष्ट्राच्या बाहेर मराठ्यांची सत्ता असायला हवी असा दूरदर्शी विचार करून त्यांनी उत्तरेकडे प्रयाण केले. समयोचित तत्काळ निर्णय घेऊन अमलात आणणारे तडफदार कुशल नेतृत्व प्राप्त झालेल्या मराठ्यांनी गुजरात,

माळवा, बुंदेलखंड हे प्रदेश मराठा साम्राज्यात आणले. अतुलनीय रणचातुर्याने बाजीरावांनी उत्तरेत मराठ्यांचा दरारा निर्माण केला. शिंदे, होळकर यांच्यासारख्या मराठा सरदारांच्या पुरुषार्थ-पराक्रमाचा यथोचित गौरव केला. याच काळात ग्वाल्हेर, इंदौर, देवास अशी संस्थानं निर्माण झाली. चारशे वर्षांच्या यावनी सत्तेनंतर दिल्लीवर भगवा फडकवणाऱ्या बाजीरावाने सह्याद्रीच्या कुशीत वसलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्याचे रुपांतर प्रबळ मराठा साम्राज्यात केले.

## २. चित्रपटात माध्यमांतरासाठी 'राऊ' कादंबरीतील विषय

कादंबरीचा वाचक एकटाच कादंबरीचं वाचन करून साहित्यकृतीचा आस्वाद घेतो. त्या कादंबरीचे चित्रपटात माध्यमांतर केल्याने एकच वेळी अनेक प्रेक्षक त्या कलाकृतीचा आस्वाद घेऊ शकतात. चित्रपट यशस्वी झाल्यास व्यावसायिक दृष्ट्या हे लाभदायी ठरते. या व्यावहारिक अर्थकारणातून मराठी साहित्य विश्वातील सुपरिचित कादंबरीकार ना. सं. इनामदार यांच्या 'राऊ' या ऐतिहासिक कादंबरीवर आधारित संजय लीला भन्साळी यांनी 'बाजीराव मस्तानी' या चित्रपटाची निर्मिती केली. चित्रपटाच्या प्रेक्षकांना आकर्षित करण्यासाठी ज्या गोष्टींची आवश्यकता असते, त्या सर्व गोष्टींचा मोठा साठा 'राऊ' कादंबरीत होता. साहित्यकृतीवर चित्रपट निर्मिती करण्यासाठी आवश्यक असणारे दमदार कथानक 'राऊ' कादंबरीत होते. पराक्रमी योद्धा ब्राह्मण पेशवा बाजीराव आणि त्यांची बुंदेलखंड प्रांतातील यावनी प्रेयसी मस्तानी यांची प्रेम कहाणी. तिला परिवार आणि समाज यांचा प्रचंड विरोध, या सर्वांचा विरोध डावलून मस्तानीला दिलेला पत्नीचा दर्जा, बाजीरावांवर निस्सिम प्रेम करणाऱ्या निरागस धर्मपत्नी काशीबाईचे समर्पण, महालातील आणि दरबारातील राजकारण, निजामासारख्या बाह्य शत्रूशी युद्धभूमीवरील बाजीरावांचा संघर्ष, कादंबरीतील अशा अनेक नाट्यमय प्रसंगांची चित्रपट निर्मात्याला भुरळ पडणे स्वाभाविक आहे.

## ३. कादंबरी आणि चित्रपट यातील काही जाणवलेले वेगळेपण

कादंबरीचा लेखक आपल्या कथासूत्रामध्ये विविध प्रसंगांची शब्दचित्रं गुंफून साहित्याचा पट साकारतो, तर चित्रपट दिग्दर्शक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने पटकथेवर आधारित दृकश्राव्य चलतचित्रांचा गतीमान चित्रपट निर्माण करतो. चित्रपटातून आर्थिक लाभ व्हावा अशी निर्मात्याची अपेक्षा असते. त्यामुळे व्यावहारिक दृष्ट्या त्याला प्रेक्षकांची अभिरुची, आवडी-निवडीचे भान ठेवणे अपरिहार्य असते. त्यामुळे 'राऊ' कादंबरीतील मुख्य आशय-विषय अबाधित ठेऊन 'बाजीराव मस्तानी' चित्रपटाच्या कथानकामध्ये बदल केलेला दिसून येतो.

वास्तविक 'राऊ' कादंबरीतील आशय-विषयाचा आवाका, कालखंड खूप मोठा असला तरी तो अडीच तासांच्या चित्रपटात सामावून घेण्यासाठी चित्रपटात मोजकी पात्र आणि प्रसंग यांची निवड करण्यात आली. चित्रपट अधिक प्रभावी व्हावा यासाठी 'राऊ' कादंबरीतील असंख्य व्यक्तीरेखांपैकी बाजीराव, मस्तानी आणि काशीबाई या तीन प्रमुख पात्रांबरोबर, छत्रपती शाहू महाराज, चिमाजी अप्पा, राधाबाई, नानासाहेब, कृष्णाजीपंत, निजाम अशा आवश्यक मोजक्याच पात्रानुरूप कलाकार- अभिनेत्यांची निवड केली आहे. त्या कलाकारांना पात्रानुरूप साजेल अशी वेशभूषा, केशभूषा, रंगभूषा यांचा यथोचित विचार झालेला दिसून येतो. चित्रपटाच्या मर्यादेचा विचार करता, कादंबरीतील दुय्यम पात्रांना तसेच अनावश्यक प्रसंगांना टाळणे सोयीस्कर होते. संवादांसाठी इतिहासाचे भान ठेऊन चित्रपटाला साजेशी समर्पक भाषा होती. "चितेकी चाल, बाजकी नजर और बाजीराव की तलवार पर संदेह नहीं करते." असे बाजीरावांचे कादंबरीत नसलेले संवाद अभिनय करणाऱ्या कलाकाराच्या तोंडी प्रसंगोचित वाटतात.

कादंबरीच्या आरंभीच पुण्यात बाजीरावाची पत्नी काशीबाई यांना, त्यांची काही दिवसाआधी विधवा झालेली बालमैत्रिण भानूमती भेटते. पेशव्यांनी केलेल्या अन्यायामुळे आपल्या पतीचा मृत्यू झाला, असा ती आरोप करते. 'माझा हा तळतळाट कधीही भोवल्याशिवाय राहणार नाही बाईसाहेब', असे म्हणून ती निघून जाते. काशीबाईला पुढील दुर्दैवाचा जणू संकेतच मिळाला होता; तर चित्रपटाच्या आरंभी शाहू महाराजांच्या राजसभेत नवीन पेशवा कोणाला नेमावा या विषयी चर्चा सुरू असताना बाजीराव प्रवेश करून तेथील लक्षभेद परीक्षेत, अर्थात शस्त्र आणि शास्त्र यांच्या निकषावर स्वतःची योग्यता सिद्ध करतात.

कादंबरीत बाजीरावांनी नानांच्या लग्नाच्या वेळी पुण्यात आलेल्या, गाणं बजावण्याकरता आणलेल्या कलावंतांमध्ये मस्तानी होती. चित्रपटामध्ये बुंदेलखंडातून आपल्या मदतीसाठी बाजीरावांना घेऊनच येईन असे आपल्या वडिलांना आश्वासन देऊन मस्तानी पुण्यात बाजीरावकडे येते, असे दाखवले आहे.

कादंबरीतील पानपानभर वाचायला मिळणाऱ्या स्थळवर्णनाची जागा चित्रपटात दर्जेदार भव्य ऐतिहासिक नेपथ्याने घेतली आहे. चित्रपटाच्या आरंभीच रुपेरी पडद्यावर दिसणारी छत्रपती शाहूमहाराजांची भव्य आणि शानदार राजसभा, पेशव्यांचा बुलंद शनिवारवाडा तसेच त्यातील देवघर-महाल लक्षवेधी होते. बुंदेलखंडच्या राजा छत्रसालचा कक्ष, युद्धाला निघालेल्या सैन्याचे तळ आणि शामियाने, युद्धसामग्री, वाहतूक व्यवस्था, मस्तानीला कैदेत ठेवलेला कारागृह हे

सर्व इतिहासातील प्रसंग आणि स्थळे, स्टूडिओ आणि चित्रपटाचे भव्य सेट यांच्या माध्यमांतून प्रत्यक्षात प्रेक्षकांसमोर दृश्यरूपात साकारले. एके ठिकाणी बाजीराव आपले सरदार आणि सैनिकांबरोबर नृत्य करतात, तर अन्य प्रसंगी बाजीरावांची पत्नी काशीबाई आणि बाजीरावांची प्रेयसी मस्तानी एकत्र नृत्य करतात, असे चित्रपटात दर्शवले आहे. हे प्रसंग कादंबरीत नाहीत आणि इतिहासात असे घडणे तर शक्यच नाही. चित्रपटात बाजीराव आणि मस्तानी यांचा मृत्यूही एकाच वेळी होतो असे दाखवले आहे.

### ४. 'राऊ' कादंबरी आणि 'बाजीराव मस्तानी' चित्रपटातील ऐतिहासिकता

'बाजीराव मस्तानी' चित्रपटाच्या आरंभीच नमूद केले आहे की हा चित्रपट मराठी कादंबरीकार ना. सं. इनामदार यांच्या 'राऊ' कादंबरीवर आधारीत आहे. परंतु हा चित्रपट इतिहासातील सत्य घटना-प्रसंगांशी, रूपांशी एकरूप असल्याचा कोणताही दावा करत नाही.' कादंबरी आणि चित्रपटाची नायिका मस्तानी विषयी दोन्ही कलाकृतींमध्ये भेद दिसून येतात. चित्रपटात दाखवल्याप्रमाणे बुंदेलखंडाहून छत्रसालच्या वतीने पुण्यात बाजीरावाकडे मदत मागण्यासाठी आलेली मस्तानी, कादंबरीनुसार नानांच्या लग्नाच्या वेळी पुण्यात गाणं बजावण्याकरता आलेल्या कलावंतांबरोबर आली होती. मस्तानीविषयी कादंबरीकार ना. सं. इनामदार यांनी केलेले मतप्रदर्शन चिकित्सात्मक विचार करायला लावणारे आहे. 'इतिहासात मस्तानीचा मूळ उगम अज्ञात आहे. तज्ज्ञांत मतमतांतरे आहेत. कादंबरीकार म्हणून मला त्यांचाशी कर्तव्य नाही. अर्थात माझ्या पद्धतीने मी त्याचा मागोवाही घेतला आहे. कलात्मक सोय म्हणून तिचे उगमस्थान बुंदेलखंडात आहे असे गृहीत धरून मी तिचे चित्र रंगवलं आहे. तेवढे माझ्यापुरते पुरेस आहे.[५]" यावरून 'राऊ' कादंबरी आणि त्यावर आधारित 'बाजीराव मस्तानी' चित्रपटातील ऐतिहासिकतेचा अंदाज घेता येत असला, तरी दोन्ही कलाकृतींमध्ये पेशवा बाजीरावांचा ऐतिहासिक विषय प्रस्तुत करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते.

## 'पानिपत' या कादंबरीचे 'रणांगण' नाटकात प्रकारांतर

### १. मराठी कादंबऱ्यांचे नाटकामध्ये प्रकारांतर

मराठी साहित्यिक नेहमी कथा, कविता, कादंबरी, नाटक अशा विविध साहित्यप्रकारांमधून अभिव्यक्त झाले आहेत. कालपरत्वे परिस्थितीनुसार अनेकदा काव्याचे कथेत, कथेचे कादंबरीत तर कादंबरीचे नाटकात प्रकारांतर करण्यात आले आहे. सध्याच्या काळात कादंबरी अथवा नाटकाची संहिता वाचण्यापेक्षा रसिक

प्रेक्षक प्रत्यक्ष नाट्यप्रयोग पाहण्यास प्राधान्य देतात. त्यामुळे कादंबरीचे नाटकात प्रकारांतर झाल्याचे दिसून येते. 'शितू, देवकी, पावनाकाठचा धोंडी, स्वामी, कल्याणी, मृत्युंजय, रथचक्र, कोंडुरा' या कादंबऱ्यांचे याच नावाने नाटकांत प्रकारांतर झाले. तर काही कादंबऱ्यांचे वेगळ्या नावाने नाटकांमध्ये प्रकारांतर झाले आहे. त्यात 'अथांग' या कादंबरीवर आधारित 'महासागर' तसेच 'बखर एका राजाची' वर आधारित 'टाहो', 'सावल्या'वर आधारित 'दुर्गा' अशी प्रकारांतराची यादी वाढत आहे. यापैकी 'पानिपत' या ऐतिहासिक कादंबरीवर आधारित लेखक विश्वास पाटील यांनी स्वतः 'रणांगण' या नाटकात केलेले प्रकारांतर लक्षवेधी ठरले.

**२. पानिपत विषयाला समर्पित मराठी कादंबऱ्या**

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मुघल सत्ता दुर्बल झाली. स्वराज्याचे तत्कालीन पेशवे बाळाजी बाजीरावांनी मोगल साम्राज्याच्या संरक्षणाची जबाबदारी अहमदिया कराराद्वारे स्वीकारली. तिथे पेशव्यांनी नियुक्त केलेल्या दत्ताजी शिंदेना मारून, अहमदशाह अबदालीने भारतात प्रवेश केला. त्याला हुसकून लावण्यासाठी सदाशिवराव भाऊ मराठ्यांची सशस्त्र सेना घेऊन उत्तरेत अबदालीवर चाल करून गेले. १४ जानेवारी १७६१ रोजी मराठे आणि अफगाणी यांच्यात पानिपत येथे घनघोर युद्ध झाले. हा इतिहास पानिपतची बखर, भाऊसाहेबांची बखर, भाऊसाहेबांची कैफियत, होळकरांची थैली, नाना फडणवीसांचे आत्मचरित्र या बखरींमध्ये वर्णन केला आहे. आधुनिक साहित्यामध्ये 'दुर्दैवी रंगु'- चिं. वि. वैद्य, 'चंबळेच्या खोऱ्यात'- स. शं. देसाई, 'पानिपतची मोहीम'- ना. वि. बापट आणि विश्वास पाटील यांनी साकारलेली 'पानिपत' अशा कादंबऱ्यांमधून मांडला आहे. यापैकी 'पानिपत' कादंबरीचे स्वतः लेखकाने 'रणांगण' या नाटकात अवस्थांतर केले. रंगभूमीवर पानिपतची रणभूमी साकारणे सोपे नव्हतेच.

**३. 'पानिपत' कादंबरीवर आधारित 'रणांगण' नाटक**

'पानिपत' सारख्या अथांग विषयावर साकारलेल्या प्रदीर्घ ऐतिहासिक कादंबरीतील असंख्य व्यक्तिरेखांमधून आवश्यक अश्या महत्त्वपूर्ण पात्रांची निवड करणे अवघड होते. तसेच एका प्रसंगावर आधारित दुसरा प्रसंग, त्याचे पडसाद पुढच्या प्रसंगात उमटणे, अशा अगणित प्रसंगाच्या शृंखलामधून नाट्यकथेसाठी नेमके प्रसंग निवडणे कठीणच होते. 'पानिपत' या कादंबरीमध्ये वाङ्मयीन मूल्यांबरोबर नाट्यमूल्यही आहे. त्यामुळे कादंबरीने नाटकांत प्रकारांतर करणे सुलभ वाटत असले, तरी नाटकाचा फॉर्म गवसण्याचे मोठे आव्हान लेखकासमोर होते. ते त्यांनी समर्थपणे स्वीकारले आणि सर्जनशील प्रतिभेच्या साहाय्याने आपल्याच

'पानिपत' कादंबरीतील रणसंग्रामाचा भव्यपट 'रणांगण'च्या माध्यमाने रंगभूमीवर यशस्वीरित्या प्रस्तुत केला.

### ४. 'पानिपत' कादंबरी आणि 'रणांगण' नाटक : साम्य-भेद

'पानिपत' या कादंबरीत लेखकाने पेशवेकालीन व्यक्तिरेखांचे शब्दचित्र तयार केले. त्यानुसार त्यांनी 'रणांगण' नाटकातील त्या पात्रांच्या भूमिकेसाठी निवडलेल्या अभिनेत्यांची वेशभूषा, रंगभूषा, संवादशैली पात्रांच्या ऐतिहासिक प्रतिष्ठेला शोभेल अशी होती. कादंबरी वाचलेला वाचक जेव्हा नाटकाचा प्रेक्षक बनतो आणि त्याच कादंबरीवर आधारित नाटक पाहतो, तेव्हा कादंबरीतील व्यक्तिचित्रण वाचून त्याच्या अंतरंगात उमटलेली व्यक्तिरेखा त्याला 'रणांगण' नाटकात रंगमंचावर पाहायला मिळते. 'फ्लॅशबॅक' पद्धतीने रंगभूमीवर सादर होणाऱ्या या नाटकातील प्रत्येक प्रवेशाचे ताण मध्यवर्ती अंतीम महासंग्रामाकडे खेचले जात असल्याचे जाणवते. कादंबरीचा एवढा मोठा आवाका नाटकात मांडतांना त्या प्रक्रियेत बदल अपेक्षित असतात. प्रस्तुत नाटकात काही पात्रे, प्रसंग वगळले तरी त्याचा परिणाम मूळ आशयावर जाणवत नाही. एकामागून एक प्रवेश रंगमंचावर प्रस्तुत होतांना नाट्याचा कथाप्रवाह अतिशय वेगाने उत्कर्षबिंदूकडे मार्गक्रमण करत असल्याचे प्रतीत होते.

### ५. इतिहास आणि कल्पना यांचा सुमेळ

'रणांगण' नाटकाचा आरंभ कल्पक असला तरी लक्षवेधी आहे. पानिपतच्या युद्धात वीरमरण प्राप्त झालेल्यांना वर्षातून एकदा मकरसंक्रांतीच्या रात्री मुक्ती मिळते. या प्रसंगातून ऐतिहासिक नाटकाला सुरवात होते. पहिल्याच प्रवेशात पानिपतच्या मोहिमेतील अफगाणी सैनिकांबरोबर मराठ्यांचेही आत्मे चिरनिद्रेतून जागृत होऊन युद्धस्मृतींना उजाळा देतात. पानिपतच्या युद्धात सदाशिवराव भाऊ यांच्यामुळे आपला पराजय झाला असे मराठे सैनिक मानतात; तर दुसरीकडे अफगाणी शत्रूसैनिक भाऊसाहेबांच्या पराक्रमाचे गुणगान करतात. या प्रवेशातील असा हा विरोधाभास प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतो. गारदी सैनिक वारंवार या नाटकात मराठी सैनिकांना भाऊसाहेबांच्या धीरोदात्त पराक्रमाबद्दल अभिमानाने सांगतात. धीरोदात्त, रणझुंजार, करारी सदाशिवराव अर्थात भाऊसाहेब हे 'पानिपत' कादंबरीचे आणि 'रणांगण' नाटकाचे चरित्रनायक आहेत. त्यांच्या स्वभावाचे दर्शन कादंबरीत वाचकांना तर नाटकात दर्शकांना विविध प्रसंगातून होते. कित्येक दिवस अन्न-पाण्यावाचून उपाशी असलेले मरणासन्न वीर मराठे जेव्हा पानिपतावर अखेरची झुंज देण्यास सिद्ध होत होते, तेव्हाच नानासाहेब पेशवे नऊ वर्षाच्या मुलीशी विवाहकर्म

करून मिष्टान्नावर ताव मारत असल्याची वार्ता येते. ते ऐकून व्यथित होऊन आक्रंदन करणारे भाऊसाहेब नाटकाच्या शेवटी पराक्रमाची शर्थ करीत अफगाणी फौजेला भिडतात.

**'स्वामी' या कादंबरीचे 'स्वामी' या मालिकेत माध्यमांतर**

**१. रमाबाईंचे स्वामी माधवराव**

पानिपत युद्धानंतर पेशवा पदी बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेबांचे चिरंजीव माधवराव यांची वयाच्या सोळाव्या वर्षी नियुक्ती झाली आणि वयाच्या सत्ताविसाव्या वर्षी या तरुण तडफदार पेशव्यांचा मृत्यू झाला. पत्नी रमाबाईंनी त्यांना अखेर पर्यंत साथ दिली. मिळालेल्या अकरा वर्षांच्या कारकिर्दीत माधवरावांच्या जीवनात अगणित, अनपेक्षित आणि अकल्पित घटना घडत गेल्या. रणजीत देसाई सारख्या कादंबरीकाराच्या प्रतिभेला आवाहन करणारा हा रमा माधवरावांचा विविध रंगांनी रंगलेला जीवनपट होता.

रणजीत देसाईंनी 'स्वामी' कादंबरीच्या कथासूत्रात रमा माधवाचे भावजीवन केंद्रस्थानी ठेवून निवडक ऐतिहासिक प्रसंगांची गुंफण करून दर्जेदार साहित्यकृती निर्माण केली. वैयक्तिक जीवनात माधवराव प्रेमळ, शुद्ध मनाचे, धार्मिक वृत्तीचे, सार्वजनिक सद्भावनेने प्रेरित असलेले प्रेमळ तसेच सुस्वभावी व्यक्तिमत्त्व होते. पेशवे म्हणून ते कुशल प्रशासक, यशस्वी राजकारणी, धीरोदात्त योद्धा होते. त्यांच्या जीवनातील वैयक्तिक आणि राजकीय घटना निवडून रणजीत देसाईनी कादंबरीच्या चरित्रनायकाचे अनुपम दर्शन घडवले आहे. कादंबरीत रमाबाईंचे 'स्वामी' माधवराव आहेत, तर माधवरावांचे 'स्वामी' श्रीगजानन आहेत.

**२. स्वामी : कादंबरी, नाटक आणि मालिका**

मराठी साहित्यविश्वात जनमान्यता प्राप्त झालेल्या लक्ष्यवेधी 'स्वामी' कादंबरीच्या यशानंतर तिचे 'स्वामी' नाटकात प्रकारांतर झाले आहे.[६] 'स्वामी' कादंबरीने नाटकात प्रकारांतर करताना नाट्य सादरीकरणाचा विचार करून यथोचित बदल करण्यात आले होते. पुढे 'स्वामी' कादंबरीच्या यशामुळे तिचे 'स्वामी' मालिकेत माध्यमांतर होणे अभिप्रेतच होते. 'स्वामी' कादंबरीवर आधारित 'स्वामी' नाटकापेक्षा चित्रभारती निर्मित २७ भागांची, दूरदर्शनवर आठवड्यातून एकदा प्रस्तुत झालेली 'स्वामी' मालिका अधिक लोकप्रिय ठरली होती. कादंबरी आणि दूरचित्रवाणीवरील मालिका दोन्ही भिन्न कलाकृती आहेत. या दोन्हींमधून हाताळलेला ऐतिहासिक विषय सत्याचा आभास निर्माण करणारा होता. 'स्वामी' कादंबरीत रमा-

माधवाचा ऐतिहासिक जीवनपट 'शब्द' माध्यमाने कागदावर साकार झाला. कालांतराने हाच उदात्त कथाविषय त्यास अनुरूप 'स्वामी' या दूरदर्शनच्या मालिकेत 'दृश्य आणि ध्वनी' या माध्यमाने छोट्या रुपेरी पडद्यावर प्रस्तुत झाला.

## ३. 'स्वामी' मालिकेची विशेषता

दूरदर्शन वर 'स्वामी' मालिका सुरू होताच आरंभीच ऐकू येणारे मालिकेचे श्रवणीय शीर्षकगीत, कसलेल्या कलाकारांचा सर्वांग सुंदर अभिनय, सूचक देहबोली, पानिपतचा वीररसयुक्त पोवाडा, लक्षवेधक प्रकाशयोजना, हृदयाचा ठाव घेणारे पार्श्वसंगीत, प्रेक्षकांना पेशवाईच्या स्थळ-काळात घेऊन जाणारे आकर्षक नेपथ्य, या सर्वांमुळे या मालिकेला रसिक प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद प्राप्त झाला. 'स्वामी' कादंबरीचा मूळ गाभा सांभाळत मालिकेच्या दृष्टीने प्रधान्यक्रमानुरूप कथाशयातील मोजकीच निवडक प्रसंग-पात्रे स्वीकारणे क्रमप्राप्त होते. त्यामुळे इतर गौण पात्र, तसेच काही प्रसंग वगळणे अपरिहार्य ठरले. तथापि त्या मोजक्याच पात्रांनी प्रेक्षकांची मने जिंकली.

## ४. 'स्वामी' कादंबरी आणि मालिका यातील साम्य

'स्वामी' कादंबरीत अनेक नाट्यमय ऐतिहासिक प्रसंग आलेले आहेत, ते तसेच मालिकेतून सादर करण्यात आले आहेत. रणजित देसाईंनी कादंबरीत इतिहासकालीन भव्य शनिवारवाड्यातील महाल, दरबार, मेणे-पालख्या, लोड-तक्क्यांच्या बैठकी, झुंबरे, शामदाने अशा वैभवशाली ऐश्वर्यसंपन्न वातावरणाचा शब्दसामर्थ्याने प्रभावी आभास निर्माण केला आहे. मालिकेच्या सेटवर असेच आकर्षक नेपथ्य कॅमेरातून टिपले आहे. कादंबरीत रणजीत देसाईंनी पात्रांच्या पोशाखाची, साज-श्रृंगाराची, दरबारातील रीती-रिवाजांची, धार्मिक प्रथा, परंपरा उत्सवाची अत्यंत सूक्ष्म बारकाव्यांसह भरीव अशी वर्णने केली आहेत. मालिकेत ते सर्व सदृश्य दिसते. रणजित देसाईंनी ऐतिहासिक वास्तवाचे भान ठेऊन रमा माधवांची भावकथा कादंबरीत रंगवली आहे. भोळ्या राघोबादादांना हाताशी धरून आनंदीबाई सखारामबापू-नाना यांची अंतर्गत कारस्थाने, सरदारांबरोबर माधवरावांच्या मसलती, खलबते, बैठकी तसेच रणांगणावरील छावण्या यांचे मालिकेतील चित्रण कादंबरीप्रमाणेच केले आहे. मुख्य म्हणजे मालिकेतील बहुतांशी ठळक संवाद सरळ कादंबरीतून घेतले आहेत. प्रसंगही जसेच्या तसे प्रस्तुत केले आहेत.

माधवराव हे राघोबादादांच्या कैदेत असतांना निजाम प्रचंड फौज घेऊन पुण्यावर चाल करून येतो. राघोबा गांगरून जातात. उत्तर भारतात युद्धात अहमद शाह दुर्राणीचा पराभव करून 'अटक'वर हिंदवी स्वराज्याचा भगवा फडकवणारे हेच

रघुनाथराव शेवटी "माधवा आता मी काय करू?" म्हणून सल्ला विचारतात. कादंबरीत वर्णन केल्याप्रमाणे किंबहुना त्याहून उत्कट तडफदार माधवरावांचे कुशल राजकारण, मुत्सद्दी धोरण, युद्धाचे डावपेच, सक्षम नेतृत्व, धर्मश्रद्धा, राष्ट्रभक्ती, समरांगणावरील शौर्य तसेच यांचे कौशल्य यांचे दर्शन मालिकेत होते. तात्पर्य रघुनाथराव पराक्रमी होतेच परंतु त्यांना राजकारण जमले नाही. माधवरावांनी ते कुशलतेने केले. पेशवा झाल्यानंतरही देवकृत्यामध्ये माधवराव मग्न असतात. त्याचा परिणाम राज्याच्या प्रशासनावर होतो. रामशास्त्री वडिलकीच्या नात्यातून माधवरावांची उचित शब्दात व योग्यवेळी कानउघडणी करतात. माधवराव आपली चूक स्वीकारतात आणि पेशवे म्हणून न्यायाधीश रामशास्त्र्यांच्या न्यायनिष्ठुरतेचे कौतुक करतात. त्यातून माधवरावांचे थोरपण प्रगट होते. माधवरावांचे हे थोरपण रामशास्त्र्यांना प्रसन्न करून त्यांच्या मनात आपल्या स्वामीबद्दल आदरभाव निर्माण करते. कादंबरीतील हा प्रसंग मालिकेतही तसाच चित्रित करण्यात आला आहे.

**५. 'स्वामी' मधील स्त्री व्यक्तिरेखांचा परिचय**

'स्वामी' कादंबरीत रणजीत देसाईंनी पेशवेकालीन रमाबाईंसह गोपिकाबाई आणि आनंदीबाई अशा तीन भिन्न प्रवृत्तीच्या प्रमुख स्त्रीव्यक्तीरेखांचे चित्रण केले आहे. 'स्वामी' मालिकेतही ही पात्रं, महिला कलाकारांनी प्रभावीपणे साकारली आहेत. त्यांची ऐतिहासिक पार्श्वभूमी अभ्यासकांनी जाणून घेणे आवश्यक आहे.

**गोपिकाबाई :** बाजीराव पेशव्यांची सून, नानासाहेब पेशव्यांची पत्नी आणि माधवरावांची आई, परंतु दुर्दैवी ठरली. आपल्या पतीचे आणि तीन तरुण मुलांचे मृत्यू पाहण्याचे दुर्भाग्य तिच्या नशिबी आले. पानिपताच्या युद्धानंतर पती नानासाहेब पेशवे मरण पावले. त्याआधी पानिपतच्या समरांगणावर विश्वासराव धारातिर्थी पडले, दुसरे चिरंजीव माधवराव क्षयाने अल्पायुष्यात निवर्तले. तिसऱ्या नारायणरावाचा डोळ्यादेखत शनिवारवाड्यात गारद्यांनी जीव घेतला. पुढे हे कारस्थान आनंदीबाईंचे होते हे सिद्ध झाले.

**आनंदीबाई :** राघोबादादांची पत्नी, महत्त्वाकांक्षी बाई, जिला सोन्याच्या अलंकारांची भयंकर लालसा होती. तिला आपला नवरा 'पेशवे' पदाचा हक्कदार वाटत होता. दीर नानासाहेब मरण पावल्यावर आपल्या नवऱ्याला पेशवेपद मिळणार असे वाटत असतांना, तिचा सोळा वर्षांचा पुतण्या माधवरावांना पेशवेपद दिल्यामुळे ती संतापते. कट-कारस्थान करून पेशवेपद मिळवण्याचा हर एक प्रयत्न करते. त्यातूनच ती माधवाचा आणि पर्यायाने रमाबाईचाही द्वेष करते.

**रमाबाई :** पेशवाईचा इतिहास लिहिणाऱ्या इतिहासकारांनी माधवाच्या रमेचा

जसा सन्मान केला तसा अन्य कुठल्याच पेशव्यांच्या घराण्यातील स्त्रीचा झालेला दिसत नाही. आपल्या सोज्वळ, निरागस स्वभावाने तिने सर्वांची मने जिंकली. इतिहासकारांप्रमाणे मराठी साहित्यिकांनीही तिच्याविषयी सन्मानपूर्वक लेखन केले. रणजीत देसाईंना प्रेरणादायी ठरलेली ही रमा 'स्वामी' कादंबरीत शांतपणे विकसित होणारे पात्र आहे.

**६. आरंभ आणि शेवट**

'स्वामी' कादंबरीचा आरंभ माधवराव पेशव्यांच्या दरबारापासून होतो; तर शेवट माधवरावांच्या निधनानंतर रमाबाईच्या सती जाण्याच्या ऐतिहसिक प्रसंगाने होतो. 'स्वामी' मालिकेतही प्रथम भागाचा आरंभ आणि अंतिम भागाचा शेवट सारखाच असला तरी दूरदर्शनवर जिवंत 'रमा-माधव' आणि इतर ऐतिहासिक पात्रं पाहणे, त्यांचे संवाद ऐकणे ही अनुभूती अनुपमच असते. नेहमी भरजरी नऊवारी कापड नेसून सौभाग्याचे अलंकार परिधान करून दिसणारी रमाबाई, अचानक माधवरावांच्या निधनानंतर मळवट भरुन, सफेद वस्त्र नेसून, केस मोकळे सोडून येते. तिचे ते सतीरूप पाहून हृदयाचा थरकाप होतो. माधवरावांबरोबर रमाबाई सती गेल्यानंतर अंतराळात दोन पक्षी विहार करताना दिसतात आणि मालिका संपते.

**७. स्वामी कादंबरी आणि मालिका : इतिहासाशी प्रामाणिक कलाकृती**

रणजित देसाईंनी 'स्वामी' कादंबरीत माधवरावांचा हिंदवी स्वराज्याच्या पेशवेपदी विराजमान झाल्यापासून ते त्यांच्या निर्वाणापर्यंतचा जीवनपट मांडला आहे. तत्कालीन राजकीय आणि सामाजिक अंतःप्रवाहांचा वेध घेत घटीत प्रसंग शब्दांच्या माध्यमाने पुनर्जिवित करतांना रणजित देसाई इतिहासाशी प्रामाणिक राहिले आहेत. याचा प्रत्यय 'स्वामी' कादंबरी वाचतांना येतो. वर्णनशैलीवर पेशवेकालीन बखरींचा प्रभाव दिसून येत असला तरी प्रसंगनिवड करताना ते सजग दिसतात. रियासतकारांनी नोंदवलेल्या ऐतिहासिक प्रसंगांची निवड करून कादंबरीत ते जिवंत करून प्रस्तुत करण्याची कलात्मता लेखकाकडे आहे. 'स्वामी' मालिकेची निर्मिती करताना दिग्दर्शकाने मूळ कादंबरीचा आशय-विषय स्वीकारला, त्याचबरोबर कादंबरीत आहेत तीच पात्रं, घटना-प्रसंग यांची मालिकेच्या मार्यादा ओळखून आवश्यकतेनुसार निवड केली आहे तात्पर्य, 'स्वामी' कादंबरीत त्याचे जसे वर्णन केले आहे. तसेच स्वामी मालिकेत चित्रण झाले आहे.

**समारोप**

राष्ट्रदेवतेला रक्ताने अर्घ्य अर्पण पराक्रमी योध्यांचा विरांगनांचा देदिप्यमान

तेजस्वी इतिहास मराठी साहित्यिकांनी आपल्या साहित्यामधून सन्मानाने प्रस्तुत केला. त्यातूनच मराठी साहित्यविश्वात ऐतिहासिक कादंबऱ्यांचे वैभवशाली दालन निर्माण झाले आहे. कित्येक कादंबऱ्यांमध्ये छत्रपतींची शिवशाही अवतरती आहे. पेशवाईवर आधारित मराठी कादंबऱ्यांची संख्या मोठी आहे. त्यापैकी ना. सं. इनामदारांच्या 'राऊ' कादंबरीचे 'बाजीराव-मस्तानी' या हिंदी चित्रपटात माध्यमांतर झाले. विश्वास पाटीलांनी आपल्या 'पानिपत' या कादंबरीचे 'रणांगण' नाटकात प्रकारांतर केले, तर रणजीत देसाई यांच्या 'स्वामी' या कादंबरीचे 'स्वामी' या मालिकेत माध्यमांतर झाले. प्रस्तुत साहित्यकृतीतील ऐतिहासिक विषयांचे महत्त्व, प्रेक्षकांची अभिरुची, तसेच आधुनिक तंत्रज्ञान, प्रकार आणि माध्यमांनुसार यथोचित बदल, अर्थकारण यांचा विचार करून प्रस्तुत साहित्यकृतींचे प्रकारांतर-माध्यमांतर करण्यात आले होते. विद्यमान काळात इतिहासाचे भान ठेऊन अशा साहित्यकृतींचे योग्यरीत्या प्रकारांतर, माध्यमांतर करणे लाभदायी आहे.

**निष्कर्ष**

विद्यमान काळात साहित्यकृती वाचून समजून घेण्यापेक्षा, रंजनात्मक पद्धतीने त्याने दृक्‌श्राव्य माध्यमांनी केलेले प्रस्तुतीकरण अधिक चांगल्याप्रकारे समजते. या मानवसुलभ स्वभावामुळे साहित्याची प्रकारांतर-माध्यमांतर प्रक्रिया कार्यान्वित झाली. साहित्याचे प्रकारांतर-माध्यमांतर झाल्यामुळे साहित्यकृती अधिक लोकांपर्यंत पोहोचते, तसेच एकाच वेळी अनेकजण तिचा आस्वाद घेऊ शकतात. मूळ मराठी साहित्यकृतीमध्ये सर्जनशील क्षमता असल्यामुळे ना. सं. इनामदार लिखित 'राऊ' या कादंबरीचे 'बाजीराव-मस्तानी' या हिंदी चित्रपटात माध्यमांतर झाले. विश्वास पाटील यांच्या 'पानिपत' या कादंबरीचे लेखाकानेच 'रणांगण' नाटकात प्रकारांतर केले आणि रणजीत देसाई यांच्या 'स्वामी' या कादंबरीचे 'स्वामी' या मालिकेत माध्यमांतर झाले.

ऐतिहासिक साहित्यिक हा प्रतिभवंत असावाच, तसाच तो इतिहासाचा अभ्यास करून सत्यअसत्याचा शोध घेणारा अभ्यासक असणे आवश्यक आहे.

विज्ञान-तंत्रज्ञानाच्या युगात माध्यमांतरित यशस्वी साहित्यकृतीचे आस्वादन अधिक प्रचलित होत आहे. लोकप्रिय साहित्यकृतीचे चित्रपटात होणारे माध्यमांतर व्यावसायिक दृष्ट्या लाभदायी ठरत असल्यामुळे निर्मात्यांनी साहित्याचे माध्यमांतर करायला आरंभ केल्याचे जाणवते. अर्थात, माध्यमांतराचे एक कारण अर्थकारण आहे.

'राऊ' कादंबरी वाचनापेक्षा रंजनात्मक चित्रपटाची प्रत्यक्ष चित्रपटगृहात 'बाजीराव मस्तानी' चित्रपट पाहिल्यावर प्राप्त होणारी अनुभूती, प्रेक्षकांच्या मनावर ठसा उमटवणारी होती. हे सत्य असले तरी इतिहासातील पराक्रमी योद्धा बाजीराव केवळ मस्तानीचा प्रियकर म्हणून लक्षात राहतो. वास्तविक दोन्ही कलाकृतींमध्ये कर्तृत्ववान पेशवा बाजीराव यांचा गौरवशाली इतिहास प्रभावीपणे प्रस्तुत करणे आवश्यक होते. 'पानिपत समरांगण' या ऐतिहासिक प्रसंगावर 'पानिपत' कादंबरी नंतर त्यावर आधारित 'रणांगण' नाटक एकाच लेखकाने निर्माण केलेले दोन भिन्न साहित्यप्रकार आहेत. त्यात पानिपत युद्धाचा समान कथाशय असला तरी साहित्यप्रकाराच्या प्रकृतीनुसार दोन्हीमध्ये वेगळेपणा जाणवणे स्वाभाविक आहे.

स्वामी कादंबरी, नाटक आणि दूरदर्शन मालिका यात समान गाभा असला तरी कथाशयाच्या आविष्कारामध्ये प्रकार आणि माध्यमानुसार वेगळेपणा जाणवतो, हे निर्विवादपणे स्वीकारावे लागते. साहित्याचे प्रकारांतर-माध्यमांतर करत असताना प्रकारानुरूप तथा माध्यमानुरूप साहित्यकृतीतील मूळ गाभा अबाधित ठेवून यथोचित बदल करणे अपरिहार्य ठरते. परंतु अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली अनऐतिहासिक विषयांचे प्रस्तुतीकरण अयोग्यच ठरते.

## संदर्भ सूची


- पगडी सेतुमाधवराव, छत्रपती शिवाजी, अनु. वांद्रेकर, कल्पना, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, २०१९.
- विभा शहा, मराठी ऐतिहासिक कादंबरी: एक अभ्यास, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९९८.
- पंचधारा, वर्ष ६४, अंक दुसरा, एप्रिल ते जुन २०२२. ऊ.नि.
- इनामदार ना. सं., 'राऊ', कॉन्टिनेन्टल, प्रकाशन, पुणे, १९९२.


## आधार ग्रंथ


- पाटील विश्वास, पानिपत, राजहंस प्रकाशन, पुणे, १९९८,
- पाटील विश्वास, रणांगण, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, २०२२.
- इनामदार ना. सं., 'राऊ', कॉन्टिनेन्टल, प्रकाशन, पुणे, १९०४.
- देसाई रणजित, स्वामी, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९६२.